विमुक्त जाती सेवा समिती संचलित

# ग्रामीण कला वाणिज्य एवं विज्ञान महाविद्यालय, वसंतनगर
# ता. मुखेड जि. नांदेड.

हिन्दी विभाग वे दारा आयोजित

## विश्व हिंदी दिवस के उपलक्ष मे
## विषय:- हिंदी भाषा की वैश्विक स्थिती
## सन (2021-22



# पत्र पत्रिका में प्रसिद्धी

पेपर
योग्य दरात
मिळण्याचे ठिकाण
शिल्पा कृषी भांडार

वतनवाला

## हिंदी भाषा विश्वभाषा बनू पाहते आहे - प्रा.डॉ.सौ.कांचनमाला बाहेती



**नांदेड (प्रतिनिधी)**

१४ सप्टेंबर १९४९ पासून हिंदी भाषा राष्ट्रभाषा म्हणून आपल्या देशात लागू झाली. त्याचबरोबर राजभाषा, संपर्क भाषा म्हणूनही तिने आपले स्थान अबाधित राखले आहे. भारतीय स्वातंत्र्य संग्रामात हिंदीचे महत्वाचे योगदान राहिले आहे. हिंदी भाषा बोलायला व लिहायला सरळ व सोपी आहे. हिंदी विश्वभाषा दिवस १० जानेवारी २००६ पासून माजी पंतप्रधान डॉ.मनमोहन सिंग यांच्या काळापासून साजरा केला जात आहे. जागतिक स्तरावर हिंदी भाषेचा प्रचार व प्रसार व्हावा हा या पाठीमागचा उद्देश आहे. विदेशी दुतावास व अन्य ठिकाणी हा दिवस मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो. हिंदीला राष्ट्रभाषा बनवण्यात अनेक अहिंदी व हिंदी तथा विदेशी विद्वानांचे योगदान मोठ्या प्रमाणावर राहिले आहे. आज या भाषेला प्रसारीत करण्यात प्रवासी भारतीय, जागतिकीकरण, विविध हिंदी सिनेमे, धारावाहीक, विविध हिंदी गीत व अन्य माध्यमांचे मोठे योगदान राहीले आहे. इंटरनेट व संगणकाचे उपयोग या भाषेच्या प्रचार प्रसारासाठी मोठ्या प्रमाणावर होतांना दिसतो आहे. भारतीय सभ्यता व संस्कृतीच्या आकर्षणापोटी अनेक विदेशी भारतात येतात व ते हिंदी भाषा शिकून त्याचा प्रचार-प्रसार आपआपल्या देशात करताना दिसतात. भारताचे अध्यात्म, संगीत, योगा हे ही या भाषेला विश्वभाषा बनवण्यात महत्वाचे योगदान देत आहेत. हिंदी भाषेचे साहित्य समृध्द असून शब्दकोशही समृध्द आहे. अनेक भाषेतील शब्दांना हिंदीने आत्मसात केले आहे. आज हिंदी भाषा रोजीरोटीची भाषा बनली असून जगात अनेक भाषा लुप्त होत असताना आज हिंदी भाषा विश्वभाषा बनण्यासाठी सक्षम आहे असे प्रतिपादन प्रतिभा निकेतन महाविद्यालय नांदेड येथील हिंदी विभाग प्रमुख प्रा.डॉ. सौ.कांचनमाला बाहेती यांनी ग्रामीण (कला, वाणिज्य व विज्ञान) महाविद्यालय वसंतनगर ता.मुखेड जि.नांदेड येथे हिंदी विभाग द्वारा विश्व हिंदी दिवसाचे औचित्य साधून आयोजित 'हिंदी भाषा की वैश्विक स्थिति' या विषयावर प्रमुख व्याख्यात्या म्हणून बोलताना केले.

यावेळी अध्यक्षीय समारोप करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.हरिदास राठोड म्हणाले की, आज जागतिक स्तरावर हिंदी भाषा बोलणाऱ्यांची संख्या द्वितीय स्थानी आहे. मराठी भाषा, हिंदी भाषा दोघांचीही लिपी देवनागरी ही एकच आहे. केंद्र सरकारकडून हिंदी भाषेचा प्रचार-प्रसारासाठी विविध शिष्यवृत्या दिल्या जातात. केंद्र सरकारच्या अनेक कार्यालयात हिंदी भाषेच्या प्रचार प्रसाराचे काम केले जाते. विद्यापीठ अनुदान आयोग, रेल्वे, बँकिंगचा उल्लेख करावा लागेल. विविध क्षेत्रांना एकत्र जोडण्याचे काम हिंदी भाषा करते. आज सर्वत्र हिंदी भाषेचा बोलबोला वाढत जातो आहे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रस्तूत विभागाचे विभाग प्रमुख प्रा.डॉ.गुरूनाथ कल्याण यांनी करून कार्यक्रम आयोजना पाठीमागची भूमिका विशद केली. त्यांनी यावेळी या दिवसाचे महत्व विशद केले. हिंदी भाषा व साहित्याच्या बाबतीत ही मांडणी केली. सूत्रसंचलन या विभागात कार्यरत प्रा.डॉ.रामकृष्ण बदने यांनी केले तर पाहुण्यांचा परिचय व आभार प्रा.डॉ.व्यंकट चव्हाण यांनी केले.

## हिंदी विश्वभाषा बनू पाहतेय–प्रा.डॉ.बाहे

**मुखेड/ प्रतिनिधी**

हिंदी भाषा राष्ट्रभाषा म्हणून आपल्या देशात १४ सप्टेंबर १९४९ पासून लागू झाली. त्याचबरोबर राजभाषा, संपर्क भाषा म्हणूनही तिने आपले स्थान अबाधित राखले आहे. भारतीय स्वातंत्र्य संग्रामात हिंदीचे महत्वाचे योगदान राहिले आहे. हिंदी भाषा बोलायला व लिहायला सरळ व सोपी आहे. हिंदी विश्वभाषा दिवस १० जानेवारी २००६ पासून माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंघ यांच्या काळापासून साजरा केला जात आहे. त्यामुळे हिंदी भाषा ही विश्वभाषा बनू पाहत असल्याचे प्रतिपादन प्रतिभा निकेतन महाविद्यालय नांदेडच्या प्रा.डॉ.कांचनमाला बाहेती यांनी केले.

ग्रामीण (कला, वाणिज्य व विज्ञान)महाविद्यालय वसंतनगर ता. मुखेड जि.नांदेड येथे हिंदी विभाग द्वारा विश्व हिंदी दिवसाचे औचित्य साधून आयोजित 'हिंदी भाषा की वैश्विक स्थिति' या विषयावर प्रमुख व्याख्यात्या म्हणून त्या बोलत होत्या.

त्या म्हणाल्या की, जागतिक स्तरावर हिंदी भाषेचा प्रचार व प्रसार व्हावा हा या पाठीमागचा उद्देश आहे. विदेशी दूतावास व अन्य ठिकाणी हा दिवस मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो. हिंदीला राष्ट्रभाषा बनवण्यात अनेक अहिंदी व हिंदी तथा विदेशी विद्वानांचे योगदान मोठ्या प्रमाणावर राहीले आहे. आज या भाषेला प्रसारित करण्यात प्रवासी भारतीय,जागतिकीकरण, विविध हिंदी सिनेमे, धारावाहीक, विविध हिंदी गीत व अन्य माध्यमांचे मोठे योगदान राहिले आहे. इंटरनेट व संगणकाचे उपयोग या भाषेच्या प्रचार प्रसारासाठी मोठ्या प्रमाणावर होताना दिसतो आहे. भारतीय सभ्यता व संस्कृतीच्या आकर्षणापोटी अनेक विदेशी भारतात येतात व ते हिंदी भाषा शिकून त्याचा प्रचार-प्रसार आपापल्या देशात करताना दिसतात. भारताचे अध्यात्म, संगीत, योगा हे ही या भाषेला विश्वभाषा बनवण्यात महत्त्वाचे योगदान देत आहेत. हिंदी भाषेचे साहित्य समृद्ध असून शब्दकोशही समृद्ध आहे. अनेक भाषेतील शब्दांना हिंदीने आत्मसात केले आहे.आज हिंदी भाषा रोजीरोटीची भाषा बनली असून जगात अनेक भाषा लुप्त होत असताना आज हिंदी भाषा विश्वभाषा बनण्यासाठी सक्षम आहे.प्राचार्य डॉ. हरिदास राठोड म्हणाले की, आज जागतिक स्तरावर हिंदी भाषा बोलणाऱ्यांची संख्या दुसऱ्या क्रमांकावर आहे. मराठी भाषा, हिंदी भाषा दोघांचीही लिपी देवनागरी ही एकच आहे.केंद्र सरकारकडून हिंदी भाषेचा प्रचार प्रसारासाठी विविध शिष्यवृत्त्या दिल्या जातात. केंद्र सरकारच्या अनेक कार्यालयात हिंदी भाषेच्या प्रचार प्रसाराचे काम केले जाते. विद्यापीठ अनुदान आयोग,रेल्वे,बँकिंगचा उल्लेख करावा लागेल.विविध क्षेत्रांना एकत्र जोडण्याचे काम हिंदी भाषा करते. आज सर्वत्र हिंदी भाषेचा बोलबोला वाढत जातो आहे. विभाग प्रमुख प्रा.डॉ. गुरुनाथ कल्याण यांनी प्रास्तविक केले. सूत्रसंचालन प्रा.डॉ. रामकृष्ण बदने तर पाहुण्यांचा परिचय व आभार प्रा.डॉ. व्यंकट चव्हाण यांनी केले. कार्यक्रमास उपप्राचार्य अरुकुमार थोरवे,डॉ. देविदास केंद्रे, नॅक समन्वयक प्रा. डॉ. उमाकांत पद्मवार,आय.क्यू.ए.सी. समन्वयक प्रा.बळीराम राठोड, रोसेयो कार्यक्रम अधिकारी प्रा.एस.बाबाराव, प्रा.शंकरय्या कळ्ळीमठ,कार्यालय अधीक्षक रमेश गोकुळे,प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी,विद्यार्थी विद्यार्थिनी उपस्थित होते.

प्रमुख व्याख्याता :- प्रा.सौ.कांचनमाला बाहेती
ऑनलाइन छात्रो को



*नमस्कार,*
विमुक्त जाती सेवा समिती वसंतनगर संचलित....
*ग्रामीण (कला वाणिज्य एवं विज्ञान)महाविद्यालय, वसंतनगर
ता.मुखेड़ जिला नांदेड़.*
"हिंदी विभाग" द्वारा आयोजित....
*विश्व हिंदी दिवस के उपलक्ष्य मे*

*तिथि* :13/01/2022
*समय* : श्याम 07:00 बजे
*माध्यम: गुगल मीट* पर


*विषय:- "हिन्दी भाषा की वैश्विक स्थिति"*


*अध्यक्ष: प्राचार्य डॉ.हरिदास राठोड*
(ग्रामीण  महाविद्यालय वसंतनगर, ता.मुखेड जि.नांदेड )

*व्याख्याता: प्रा.डॉ. सौ.कांचनमाला बाहेती**
(प्रतिभा निकेतन महाविद्यालय,नांदेड़)

*गुगल मीट लिंक* https://meet.google.com/xqv-gqtn-kmy

*// आयोजक //*
*प्रो.डॉ.गुरुनाथ कल्याण*
*प्रो.डॉ.रामकृष्ण बदने*
*प्रा.डॉ.व्यंकट चव्हाण*














इस कार्यक्रम का अनेक दर्शक ने लाभ उठाया